वसई विरार शहर महानगरपालिका वृक्ष प्रा/जा. क्र/७३८/२०२०-२१
उद्यान, वन संवर्धन व वृक्षप्राधिकरण विभाग दिनांक २५/०९/२०२१

प्रति,
मा. उपसंचालक,
नगररचना विभाग,
वसई विरार शहर महानगरपालिका.

विषय :- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 मधील प्रकरण 8 मधील कलम 19 मधील तरतुदीनुसार वृक्षअधिकारी यांचा खालील नमूद सर्व्हे क्र./हिस्सा क्र. मधील निवासी वाणिज्य व सी. एफ. सी. या इमारतीचे विकासकाम ( C.C. ) बाबत वृक्ष लागवड करणे, जतन करणे याबाबतचा (VP-6061) अभिप्राय.

संदर्भ :-
1) वास्तुविशारद मे. एन कॅान प्रोजेक्ट कंन्सल्टंट यांचा दि 14/01/2020 चा अर्ज.
2) मा. उप. संचालक, नगररचना विभाग यांचे दि. 17/01/2020 अन्वये दिलेल्या अभिप्राय बाबतचे मागणी पत्र.
3) दि. 21/10/2020 रोजी जागेवर केलेला सहा.उद्यान अधिक्षक यांचा पंचनामा.
4) दि. 28/10/ 2020 ची कार्यालयीन मंजुर टिपणीनुसार मा. आयुक्त व मा. उप. संचालक , नगररचना विभाग यांचा अभिप्राय.
5) मा. आयुक्त सो. यांचे आदेश जा. क्र./वविशम/वृक्षप्राधि/136/2020 दि.03/11/2020 चे आदेश.
6) दि. 20/11/2020 रोजीचे विकासक यांचे प्रतिज्ञापत्र.
7) सातबारा प्रती.
8) गटबुक नकाशा.
9) गुगल इमेज.
10) फिजीकल सर्वेशिट.
11) इमारतीचा नकाशा (लेआउट).
12) जागेचे फोटोग्राफ्स.
13) दि.०७ /१२/2020 रोजीची कार्यालयीन मंजुर टिपणी.

वरील संदर्भानुसार मौजे उमेळे, ता. वसई, जि. पालघर येथील सर्वे नं. 23अ, हिस्सा नं. 1, 2, सर्वे नं. 23ब मधील जमीनीवर निवासी वाणिज्य व सी. एफ. सी. या इमारतीचे बांधकाम करावयाचे आहे. या भुखंडाचे एकुण क्षेत्रफळ 4640.00 चौ.मी. असुन सदर जागेत विकासक यांना प्लाननुसार निवासी वाणिज्य व सी. एफ. सी. या इमारतीचे 6970.04 चौ. मी. बांधकाम करावयाचे आहे. असे वास्तुविशारद मे. एन कॅान प्रोजेक्ट कंन्सल्टंट व विकासक मे. रूबी लाईफ स्पेस तर्फे श्री. ज्युड एस. परेरा यांनी कळविले आहे. सदरील जागेच्या वैधतेची जबाबदारी संबंधित विकासक व वास्तुविशारद यांची असून नगररचना विभागाने याबाबत सर्व तांत्रिक बाबी तपासून पुढील उचित कार्यवाही करावयाची आहे.

वृक्ष प्राधिकरण विभागाने दि. 21/10/2020 रोजी जागेवर केलेल्या पंचनाम्यानुसार सदर भूखंडावर 67 (सदुसष्ठ) वृक्ष अस्तित्वात आहेत. विकासक यांना बांधकाम नकाशानुसार सदर निवासी वाणिज्य व सी. एफ. सी. या इमारतीचे 6970.04 चौ.मी. बांधकाम करावयाचे असुन सन 2001 च्या वसई

विरार उपप्रदेशाकरिता मंजूर असलेल्या विकास नियंत्रण नियमावली मधील अ.क्र. 5.17.2 नूसार प्रस्तावित बांधकाम क्षेत्राच्या प्रति 30 चौ.मी. करिता एक वृक्ष लागवड करणे प्रमाणे खालील नमूद 16 वृक्षांची प्रजातीपैकी जागेमध्ये एकूण 233 (दोनशे तेहतीस) नविन वृक्ष तसेच सदर इमारतीच्या लेआऊट मधील आर. जी. चे क्षेत्रफळ 674.52 चौ. मी. असुन विकास नियंत्रण नियमावली मधील अ.क्र. 5.17.3 नुसार प्रती 10 चौ.मी. आर.जी. क्षेत्रामध्ये एक झाड लागवड करणेप्रमाणे 68 (अडुसष्ठ) झाडांची लागवड करून सदर झाडांचे योग्य ते संगोपन व संवर्धन करणे आवश्यक आहे. लागवड करुन सदर वृक्षांचे योग्य ते जतन व संवर्धन करणे बंधनकारक राहील.

विकासकाने पुढील नमुद प्रजातीपैकी किमान 1.50 मी.उंचीच्या एकुण 301 (तीनशे एक) वृक्षांची लागवड करुन जतन व संवर्धन केलेल्या वृक्षांचे फोटोसह सहामाही अहवाल तीन वर्ष वाढ होईपर्यंत वृक्षप्राधिकरण विभागात सादर करावयाचा आहे.

वृक्षरोपणासाठी मार्गदर्शक वृक्ष प्रजाती:-

1) कडूनिंब, 2) कांचन, 3) कुसुम, 4) रीठा, 5)स्पॅथोडिया, 6) पेल्ट्रोफोरम, 7) खाया, 8)कॅशिया, 9) बहावा, 10) जंगली बदाम, 11) सिताफळ, 12) जांभूळ, 13) आवळा, 14) सिल्वर ओक, 15) बकुळ, 16) करंज.

विकासक मे. रूबी लाईफ स्पेस तर्फे श्री. ज्युड एस. परेरा व वास्तुविशारद मे. एन कॅान प्रोजेक्ट कंन्सल्टंट यांनी भोगवटा प्रमाणपत्रासाठी प्रकरण सादर करताना वरीलप्रमाणे लागवड केलेल्या व जतन केलेल्या वृक्षांचे फोटो व स्थळ दर्शविणारा नकाशा (प्लॅन) सोबत सादर करणे बंधनकारक राहील. विकासकाने रक्कम रु. 100/- स्टॅंप पेपरवर करुन दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार व पंचनाम्यानुसार कार्यवाही न केल्यास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 चे तरतुदीनुसार कारवाई करणेत येईल.

सदरचा अभिप्राय हा महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 चे तरतुदीनुसार केवळ वृक्ष लागवड, जतन व संवर्धनासाठी पंचनामा व प्रतिज्ञापत्राच्या अधिन राहुन देणेत येत आहे. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रासाठी (C.C.) आवश्यक व बंधनकारक असलेल्या तांत्रिक बाबी नगररचना विभागाने तपासून कृपया पुढील कार्यवाही आपल्या स्तरावर होणेस विनंती आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिका जि. पालघर

1/12/2020

( धनश्री शिंदे )
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

प्रत:-

1) मे. एन कॅान प्रोजेक्ट कंन्सल्टंट - वास्तुविशारद
2) मे. मे. रूबी लाईफ स्पेस तर्फे श्री. ज्युड एस. परेरा - विकासक

टिप : विकासकाने किमान 1.50 मी.उंचीच्या एकुण 301 (तीनशे एक) वृक्षांची लागवड करुन जतन व संवर्धन केलेल्या वृक्षांचे फोटोसह सहामाही अहवाल तीन वर्ष वाढ होईपर्यंत वृक्षप्राधिकरण विभागात सादर करावयाचे बंधनकारक आहे.